तरुण भारत सोमवार, ७ मार्च २०२२

# 'रवळनाथ'च्या कामगिरीचा केरळ दौऱ्यात गौरव

प्रतिनिधी
गडहिंग्लज

रवळनाथ को-ऑप हौसिंग सोसायटीचे पदाधिकारी आणि संचालक यांनी केरळ राज्यातील त्रिसुर येथील इसाफ स्वराया मल्टिस्टेट ॲग्रो को-ऑप सोसायटीला अभ्यास दौऱ्यानिमित्य भेट दिली. यावेळी रवळनाथ सोसायटीची कामगिरी पाहून उपस्थित केरळीयन अधिकाऱ्यांनी गौरव केला.

दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी संघाकडून या दौऱ्यासाठी ३ लाखाचे अनुदान दिले होते. या दौऱ्यात केरळ व तामिळनाडूतील विविध संस्थांची पाहणी केली. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, सीईओ डी. के. मायदेव, प्रशासकीय अधिकारी सागर माने यांनी संस्थेची माहिती दिली. इसाफचे चेअरमन के. पॉल थॉमस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रवळनाथची माहिती घेवून समाधान व्यक्त केले. यावेळी इसाफचे उपाध्यक्ष जॉन थॉमस, श्रीमती सिल्वा उपस्थित होते. महाराष्ट्रात शाखा विस्तारासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तामिळनाडू येथील थिरूव्हल्लर ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटीला यावेळी भेट दिली. थिरूव्हल्लरचे सीईओ जयशंकर यांनी रवळनाथची माहिती घेवून समाधान व्यक्त केले. यावेळी रवळनाथचे संचालक आर. एस. निळपणकर, डॉ. किरण पोतदार, प्रा. विजय आरबोळे, रेखा पोतदार, उमा तोरगल्ली आदींचा या दौऱ्यात सहभाग होता.



**त्रिस्सूर : 'रवळनाथ'चे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांचा सत्कार करताना इसाफचे अध्यक्ष के. पॉल. थॉमस, उपाध्यक्ष जॉन थॉमस, श्रीमती सिल्वा यांच्यासह पदाधिकारी, संचालक.**

सकाळ



केरळ : रवळनाथचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांचा सत्कार करताना इसाफचे अध्यक्ष के. पॉल थॉमस. शेजारी जॉन थॉमस, श्रीमती सिल्वा आदींसह रवळनाथचे संचालक.

# 'रवळनाथ'च्या कामगिरीचे झाले केरळमध्ये कौतुक

## संचालकांचा अभ्यास दौरा; इसाफ स्वराया ॲग्रोला भेट

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. ६ : श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीच्या पदाधिकारी व संचालकांनी केरळ राज्यातील त्रिसूर येथील इसाफ स्वराया मल्टिस्टेट ॲग्रो को-ऑप सोसायटीला अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने भेट दिली. या वेळी सहकारातील रवळनाथची कामगिरी पाहून केरळीयन अधिकारी खूश झाले. यानिमित्ताने रवळनाथच्या कामगिरीचा डंका केरळमध्ये वाजला.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी संघाकडून रवळनाथला संचालकांच्या अभ्यास दौऱ्यासाठी तीन लाख रुपये अनुदान मिळाले आहे. त्याअंतर्गत सहकारातील आदर्श मल्टिस्टेट संस्थांच्या भेटीसाठी रवळनाथचे शिष्टमंडळ केरळ व तामिळनाडू राज्याच्या अभ्यासदौऱ्यावर गेले होते. या वेळी रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, सीईओ डी. के. मायदेव, प्रशासन अधिकारी सागर माने यांनी संस्थेची माहिती दिली.

'इसराफ'चे अध्यक्ष के. पॉल थॉमस आणि सहकाऱ्यांयांना लघुपटाद्वारे रवळनाथची यशोगाथा दाखविण्यात आली. त्यामुळे ते प्रभावित झाले. कार्यकारी उपाध्यक्ष जॉन थॉमस, श्रीमती सिल्वा उपस्थित होते. थॉमस म्हणाले, "महाराष्ट्रातील शाखा विस्तारासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी रवळनाथबरोबर सामंजस करार केला जाईल.

दरम्यान, तामिळनाडू येथील थिरुव्हल्लवर ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटीलाही शिष्टमंडळाने भेट दिली. थिरुव्हल्लवरचे सीईओ जयशंकर हे देखील 'रवळनाथ'ची यशोगाथा पाहून थक्क झाले. त्यांनीही रवळनाथशी सामंजस करार करण्याची इच्छा व्यक्त केली. दौऱ्यात संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. डॉ. किरण पोतदार, प्रा. विजय आरबोळे, रेखा पोतदार, उमा तोरगल्ली आदींचा समावेश होता.

Kolhapur, Gadhinglaj-Today
07/03/2022 Page No. 2

पुढारी



तमिळनाडू : येथील रवळनाथ सोसायटीचे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांचा सत्कार करताना तिरुवल्लुवरचे सीईओ के. जयशंकर, असिस्टंट मॅनेजर श्रीजा, श्रीमती ससून आदींसह रवळनाथाचे संचालक.

# 'रवळनाथ'च्या कामगिरीचे तामिळनाडूमध्ये कौतुक

गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा

येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या पदाधिकारी व संचालकांनी तमिळनाडू राज्यातील चेन्नई येथील तिरुवल्लुवर ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीला अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने भेट दिली. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी संघाकडून रवळनाथ सोसायटीला संचालकांच्या अभ्यास दौऱ्यासाठी ३ लाख रुपये अनुदान मिळाले आहे. त्याअंतर्गत सहकारातील आदर्श मल्टिस्टेट संस्थांच्या भेटीसाठी रवळनाथ सोसायटीचे शिष्टमंडळ केरळ व तमिळनाडू राज्याच्या अभ्यास दौऱ्यावर गेले होते.

संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले,

## संचालकांचा अभ्यास दौरा; 'तिरुवल्लुवर ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन'ला भेट

सीईओ डी. के. मायदेव, प्रशासन अधिकारी सागर माने यांनी संस्थेची माहिती दिली. तिरुवल्लुवरचे सीईओ के. जयशंकर यांनी रवळनाथाशी सामंजस्य करार करण्याची इच्छा व्यक्त केली.

दरम्यान, केरळ येथील इसाफ स्वराया मल्टिस्टेट ॲग्रो को-ऑप. सोसायटीलाही भेट देण्यात आली. रवळनाथ सोसायटीचे ज्येष्ठ संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. डॉ. किरण पोतदार, प्रा. विजय आरबोळे, रेखा पोतदार, उमा तोरगल्ली आदींचा समावेश होता.

My Kolhapur Edition
Mar 4, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in